दिनांक : २९.०५.२०२०

# माधवी ओगले व्यावसायिक शाळा
# वार्षिक अहवाल २०१९ - २०२०

- या वर्षी एकुण शाळेमध्ये ५३ विद्यार्थी आहेत. लार्क शाळेतुन २ तर फिनिक्स शाळेतुन १ विद्यार्थी आले आहेत. बाहेरील शाळेतुन ३ विद्यार्थी आले.
- या वर्षी शाळेमध्ये १ मुख्याध्यापक, १२ टिचिंग स्टाफ, ४ मावश्या, १ काका असे एकुण १८ सहकारी आहेत. नविन १ शिक्षक व ३ शिक्षिका आल्या आहेत. गायत्री भालेराव या सायकॉलॉजीस्ट शाळेत विद्यार्थ्यांच्या behaviour problem साठी येत आहेत. कराटे शिकविण्यासाठी संजय शर्मा सर येत होते.
- एम.ओ.व्ही.एस चा दुसरा युनिट चांगले सुरू आहे. त्याची वेळ सकाळी ९.३० ते ३.३० अशी आहे. येथे कार्यशाळे मध्ये बेकरी, कॅनिंग, शिवण व सिझनल विभागातील उत्पादनावर जास्त भर आहे.
- कार्यशाळेत या वर्षी ८ विद्यार्थी मदतनीस ( शुभांगी विसपुते, सिध्दार्थ आसलेकर, अनुप भगत, मयूर येवले, गिताजंली साळवेकर, गायत्री कुलकर्णी, तुषार गुप्ता, सुखदा कुलकर्णी ) म्हणून काम करीत आहेत.
- कोविड १९ या संसर्गजन्य आजारामुळे दि. १६ मार्च २०२० पासून लॉकडाउन सुरू झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळा बंद करण्यात आली होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वॅटस्अप व्दारे वर्कशीट पाठविण्यात आल्या व पेपर घेण्यात आले. हे सर्व काम दि. १५ मे २०२० पर्यंत चालू होते.

## सातत्याने चालणारे उपक्रम

- विद्यार्थ्यांना आठवडयातून एक दिवस जॉगिंग ट्रॅक वर जात होते.
- दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मंगळवारी बालकल्याण संस्थेत विद्यार्थी जात होते.
- सोमवार व गुरूवार ABT साठी सृजनरंग मध्ये विद्यार्थी जातात.
- दि. ०६/०६/२०१९ रोजी शाळेत पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावर्षी खत प्रकल्पास सुरूवात केली आहे. याची सर्व माहिती यादिवशी विद्यार्थ्यांना देण्यात आली.
- दि. २१/०६/२०१९ रोजी जागतिक योगा दिन शाळेत विद्यार्थ्यांनी योगा करून साजरा केला.
- दि. २६/०६/२०१९ रोजी पालखीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी अभंग व नृत्य याचे सादरीकरण केले.

- दि. १६/०७/२०१९ रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांना गोष्टी सांगण्यासाठी बाहेरून दिपा कोडगांवकर या पाहुण्या म्हणून आल्या होत्या.
- टिळक पुण्यतिथी निमित्त टिळकांची माहिती स्पष्ट वाचणे अशी स्पर्धा घेतली होती. तसेच प्रश्नमंजूषेचा पण कार्यक्रम सर्व विद्यार्थ्यांनसाठी होता.
- राखी पोर्णिमा, दहिहंडी हे सांस्कृतिक कार्यक्रम शाळेत साजरे केले गेले.
- शिक्षक दिनानिमित्त यावर्षी  शाळेमध्ये बनविलेल्या ब्लॉक प्रिंटीग च्या कापडी पिशव्या सर्व शिक्षकांना भेट म्हणून दिल्या.
- दि.०७/०९/२०१९ रोजी लायन्स क्लब ऑफ एरंडवणा तर्फे शिक्षिक दिना निमित्त शाळेतील शिक्षिका सौ. सुचित्रा ठिपसे व काका श्री. अनिल सातपुते हयांना गौरवण्यात आले.
- गणेशोत्सवानिमित्त शाळेत विविध स्पर्धांचे आयेजन केले होते.
- दि. ०४/१०/२०१९ रोजी विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप करण्यात आले.
- दि. ०७/१०/२०१९ रोजी शारदोत्सवा निमित्त भोंडला साजरा करण्यात आला.
- दि. १८/१०/२०१९ रोजी दिवाळी पार्टी करण्यात आली.
- दि. १४/१२/२०१९ रोजी गंमत जंमत म्हणजेच शाळेचे प्रदर्शन होते. हे प्रदर्शन बारा बलुतेदार जुने व आजच्या काळातील यावर आधारीत होते.
- दि. २४/१२/२०१९ रोजी शाळेमध्ये शेकोटी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी रघुवीर जादूगर यांचे जादूचे प्रयोग दाखविण्यात आले.
- दि. २३/०१/२०१९ रोजी ISO चे Surveillance Audit  झाले.
- दि. २६/०१/२०२० रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम, नृत्य व नाटक सादर केले.
- दि. ०१/०२/२०२० रोजी शाळेचे स्नेहसंमेलन होते. "हिमालय" हा स्नेहसंमेलनाचा विषय होता. स्नेहसंमेलनाचे पाहुण्या मा. टीना दात्रा या  होत्या.
- दि. ०५ व ०६/०२/२०२० रोजी असे एक रात्र दोन दिवस राहती सहल खोपोली येथील " र्दुशेट" येथे गेली होती.

शैक्षणिक सहल

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| जाई व जुई गट | शिवाजी नगर रेल्वे स्टेशन |
| मोगरा गट | बालगंधर्व नाटयगृहाच्या चौकात सिग्नल वर विद्यार्थ्यांनी वाहतुक नियमांचे फलक दाखवून त्याची माहिती दिली. |
| जुई गट | नदी पात्रातील धोबी घाट |
| मोगरा गट | सहकारनगर येथील आबा बागुल उद्यान |
| मोगरा गट | शारसबाग |
| जुई व जाई गट | कल्याण भेळ |
| जाई गट | हॉटेल कोलाज - वेटरच्या कामाचे स्वरूप, ऑर्डर देणे व पैशाचा हिशोब कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. |

| | |
|---|---|
| जाई गट | लॉ कॉलेज रोड वरील सिग्नलवर विद्यार्थ्यांनी वाहतुक नियमांचे फलक दाखवून त्याची माहिती दिली. |

## व्यवसाय प्रशिक्षण

- बागकाम हा उपक्रम नियोजनानुसार चालू आहे. खत उत्पादन करून त्याची विक्री करण्यास सुरूवात झाली आहे.
- दि. ३०/०७/२०१९ रोजी लघु उद्योगांतर्गत मटकी भेळचा स्टॉल विद्यार्थ्यांनी लावला होता. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली छान समजून घेऊन काम केले.

## Internship

- श्रृती वैद्य ही विद्यार्थ्यांच्या निरीक्षणासाठी येत होती.
- फर्ग्युसन कॉलेजच्या ३ विद्यार्थीनी, कर्वे संस्थेचे प्रीतेश बादर हा विद्यार्थी Internship साठी येत आहे.

## पालक कार्यशाळा

- दि. १०/०८/२०१९ रोजी वेन्यू तर्फे शाळेतील पालकांसाठी कलिका मुजुमदार व शिल्पा लोंबर यांनी 'वयात येणा-या विद्यार्थ्यांच्या समस्या' या विषयावर मार्गदर्शन केले.
- दि. ०८/०२/२०२० रोजी वेन्यू तर्फे पालकांसाठी श्री. अच्युत बोरगावकर यांनी 'शरीर साक्षरता' या विषयावर कार्यशाळा घेतली.

## बाहेरील कार्यशाळा

- दि. १९ व २०/०९/२०१९ रोजी बालकल्याणने 'फुले बनविणे' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस मिनल सोनार यांना पाठविण्यात आले.

## भेट

- दि. ११/०६/२०१९ रोजी लोकविश्वास प्रतिष्ठानच्या देसाई मॅडम यांनी शाळेला भेट देऊन माहिती घेतली.
- दि. २५/०९/२०१९ रोजी मॉडर्न कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देऊन माहिती घेतली.

## उत्पादन विभाग

- शिवण विभागात भाजीच्या पिशव्यांचे उत्पादन मोठया प्रमाणात चालू आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग उत्तम आहे. कागदी पिशव्यांचे उत्पादन चालू आहे.
- कॅन्टिन मध्ये विविध पदार्थांचे उत्पादन व विक्री चालू आहे.
- टोमॅटो व चिंच सॉस, बिस्कीटे याचे उत्पादन विद्यार्थ्यांच्या मदतीने चांगले होत आहे. कॅन्टिन मध्ये विविध पदार्थांचे उत्पादन व विक्री चालू आहे.
- गुरूकुल शाळा व प्रसन्न ऑटिझम सेंटरच्या फाईल्सच्या ऑर्डर वेळेत पूर्ण करून देण्यात आल्या.
- यावर्षी १३७ गणपती बटव्यांची विक्री केली.

- हर्मन कंपनीची २000 पणत्या रंगविण्याची ऑर्डर पूर्ण करून देण्यात आली. १000 बॉक्स पणत्याची ऑर्डर होती (१ बॉक्समध्ये २ पणत्या आहेत ). नियोजनानुसार टीमवर्कने वेळेत ऑर्डर पूर्ण करून कंपनीकडे पाठविण्यात आली. फिनिक्स शाळेतील Pre-voc च्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.
- पुणे कॉर्पोरेशन तर्फे दिव्यांग विक्री केंद्र दि. २५/१२/२0१९ रोजी पासून सुरू होणार होते. तिथे विक्रीसाठी आपल्या शाळेचा माल पाठविण्यात आला होता.

प्रदर्शन / स्टॉल

- दि. १७/0७/२0१९ रोजी प्रोत्साहन प्रदर्शन अंतर्गत रेखा कानिटकर यांनी सर्व सहभागी शाळांची मिटिंग आयोजित केली होती. यात सुवर्णा वाबळे व स्नेहल वाळिंबे या शिक्षिका सहभागी होत्या. दि. १५ व १६/११/२0१९ रोजी प्रोत्साहन तर्फे मनोहर मंगल कार्यालयात प्रदर्शन भरविण्यात आले होते. या मधे शाळेने सहभाग घेतला होता.

स्पर्धा

- लायन्स क्लब ऑफ पूना वेस्ट तर्फे समूह गायनाच्या स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले.
- बालकल्याण आयोजित केलेल्या फ्रेम बनविणे स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांक मिळाला.
- दि. १८/0९/२0१९ रोजी नवाक्षितीज शाळेनी आयोजित केलेल्या नाटय स्पर्धेत शाळेनी सहभाग घेतला होता. 'मुंबईची चाळ' याविषयावर आधारित नाटक होते. शाळेला उत्तेजनार्थचे बक्षिस तर अभिनयाचे बक्षिस मकरंद सिधये याला मिळाले. दिग्दर्शनाचे ही उत्तेजनार्थ चे बक्षिस मिळाले.
- दि. २0/0९/२0१९ रोजी कै. कमलाबाई गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत बाहेरील ७ शाळा सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेच्या पाहुण्या व परीक्षक म्हणून मा. स्वाती भावे यांनी काम पाहीले. या स्पर्धेचे आयोजन लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेने केले होते. एम.ओ.व्ही.एस शाळेतील ५ विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली.
- दि. २८.११.२0१९ रोजी नेचर लव्हर्स तर्फे मास्टर शेफ एपिक स्पर्धाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत शाळेला स्वछतेचे पारितोषिक मिळाले.

कलिका मुजुमदार
मुख्याध्यापिका
एम.ओ.व्ही.एस